**रयत शिक्षण संस्थेचे,**

# यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा

## सहशालेय उपक्रम समिती (२०२६-२७)

---

**प्रश्नमंजुषा स्पर्धा – अहवाल** **दिनांक: २९/०७/२०२६**

महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे साहेब व ज्युनिअर विभागाच्या उपप्राचार्या आदरणीय सौ. नंदिनी साळुंखे मॅडम तसेच पर्यवेक्षक आदरणीय श्री. एन.टी.निकम सर व सहाय्यक पर्यवेक्षक यांच्या मार्गदर्शनांतर्गत दि. २९/०७/२०२६ रोजी स्वातंत्र्य दिन सोहळा २०२६ निमित्त महाविद्यालयात प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून, प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांचे १० गट तयार करण्यात आले होते. क्रांतिकारकांचा इतिहास, कर्मवीर भाऊराव पाटील यांचे जीवनचरित्र, विज्ञान-तंत्रज्ञान व चालू घडामोडी या विषयांवर आधारित प्रश्न विचारण्यात आले. झटपट, दृकश्राव्य, बजर व ट्राय-ब्रेकर अशा विविध फेऱ्यांमधून स्पर्धा उत्साहात पार पडली. प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक व उत्तेजनार्थ असा निकाल तयार केला. सहशालेय समिती प्रमुख सौ. एन.ए.ढाणे मॅडम व सदस्य, भाषा विभाग व सर्व मान्यवरांच्या सहकार्याने प्रश्नमंजुषा स्पर्धा यशस्वीरित्या संपन्न झाली.









रयत शिक्षण संस्थेचे
यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयुट ऑफ सायन्स, सातारा
यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा.
उद्घाटक : मा. डॉ. सुरेश साळुंखे (साहेब), प्राचार्य, वायसीआयएस
Rayat Shikshan Sanstha's
Yashavantrao Chavan Institute of
Science, Satara.
(Autonomous)